# महिला सक्षमीकरण आणि मानवी अधिकार

**राजेश्वर वारलु काकडे**
अर्थशास्त्र विभाग
नेवजाबाई हितकरणी महाविद्यालय ता. ब्रम्हपुरी,
जि. चंद्रपूर
Email- rajeshwarkakde@gmail.com

---

***सारांश -***

*महिलांना त्यांच्या स्वातंत्र्याचा परिपूर्ण अधिकार प्राप्त करून देण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर विविध संस्था, आयोग उदयाला येत असल्याचे आपल्याला वर्तमान काळात दिसून येतात तसेच महिलांना त्यांचा अधिकार प्राप्त करून देण्यासाठी सरकारने विविध कायदे तयार केलेले आहे. महिला सबलीकरण म्हणजे एखाद्या व्यक्तीची ती क्षमता ज्याद्वारे त्यांच्यामध्ये ही क्षमता येते ज्यामध्ये तो त्यांच्या आयुष्याशी संबंधित सर्व निर्णय स्वतः घेऊ शकतो. पंडित जवाहरलाल नेहरू यांचे प्रसिद्ध वाक्य आहे, जनतेला जागृत करण्यासाठी महिलांनी जागृत होणे गरजेचे आहे तिने एकदा पाऊल टाकले की कुटुंब पुढे सरकते गाव पुढे सरकते आणि देश विकासाकडे जातो. भारतात महिलांच्या सक्षमीकरणासाठी सर्वप्रथम समाजातील हुंडा प्रथा, लैंगिक हिंसा, असमानता, भृणहत्या महिला वरील घरगुती हिंसाचार, बलात्कार यासारख्या समाजातील त्यांच्या हक्क आणि मूल्यांचा घात करणाऱ्या सर्व राक्षसी विचारसरणीचा नाश करणे आवश्यक आहे. लिंगभेदामुळे राष्ट्रांमध्ये सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक भेद निर्माण होतात जे देशाला मागे ढकलतात. भारतीय राजघटनेत अंतर्गत समानतेचा अधिकार व सुनिश्चित करण्यासाठी अशा वाईट गोष्टीचे उच्चाटन करण्यासाठी महिलाचे सक्षमीकरण हा सर्वात प्रभावी मार्ग आहे.*

***शब्दसंकेत-*** *मानवी हक्क, महिला सक्षमीकरण, सबलीकरण, लिंगभेद, योजना.*

---

**प्रस्तावना -**

लैंगिक असमानता ही भारतातील मुख्य सामाजिक समस्या आहे, ज्यामध्ये पुरुषप्रधान देशात महिला मागे पडतात. स्त्री पुरुष समानतेवर आणण्यासाठी महिला सक्षमीकरणाला गती देण्याची गरज आहे. सर्व क्षेत्रातील महिलांच्या उत्थानाला राष्ट्राच्या प्राधान्यक्रमात समाविष्ट केले पाहिजे. महिला आणि पुरुषांमधील असमानता अनेक समस्याला जन्म देते ज्या राष्ट्राच्या विकासात मोठा अडथळा बनू शकतात. समाजात त्यांना पुरुषा इतकेच महत्त्व मिळाले पाहिजे हा स्त्रियांचा जन्मसिद्ध हक्क आहे. खऱ्या अर्थाने सक्षमीकरण घडवून आणायचे असेल तर महिलांनी त्यांच्या हक्काबाबत जागरूक असले पाहिजे. केवळ घरगुती आणि कौटुंबिक जबाबदाऱ्याच नव्हे तर महिलांनी प्रत्येक क्षेत्रात सक्रिय आणि सकारात्मक भूमिका बजावली पाहिजे. महिला सक्षमीकरणात ही शक्ती आहे की त्या समाजात आणि देशात खूप बदल घडवून शकतात. समाजातील कोणत्याही समस्याला ती पुरुषापेक्षा चांगल्या पद्धतीने समोर जाऊ शकते. जास्त लोकसंख्येमुळे देशाचे आणि कुटुंबाचे होणारे नुकसान तिला चांगलेच समजते. उत्तम कुटुंब नियोजनामुळे ती देशाची आणि कुटुंबाची आर्थिक स्थिती सांभाळण्यास

पूर्णपणे सक्षम आहे. पुरुषांच्या तुलनेत स्त्रिया कौटुंबिक असो व सामाजिक हिंसाच्या प्रभावीपणे हाताळण्यास सक्षम असतात.

महिला सक्षमीकरणाच्या माध्यमातून पुरुष प्रभाव असलेल्या देशाच्या जागी स्त्री पुरुष समानतेची मजबूत अर्थव्यवस्था असलेल्या देशाची जागा घेणे शक्य आहे. महिला सक्षमीकरणाच्या मदतीने कुटुंबातील प्रत्येक सदस्याचा विकास फार कष्ट न करता सहज करता येतो. कुटुंबातील प्रत्येक गोष्टीसाठी एक स्त्री अत्यंत जबाबदार मानली जाते, म्हणून ती सर्व समस्या चांगल्या प्रकारे सोडवू शकते महिला सक्षमीकरणाने संपूर्ण समाज आपोआप सक्षम होईल. मानवी आर्थिक किंवा पर्यावरणाशी संबंधित कोणत्याही लहान मोठ्या समस्येवर महिला सक्षमीकरण हा उत्तम उपाय आहे. गेल्या काही वर्षात त महिला सक्षमीकरणाचा लाभ आपल्याला मिळत आहे. स्त्रिया त्यांच्या आरोग्य, शिक्षण, नोकरी आणि कुटुंब, देश आणि समाजाप्रती जबाबदारी याविषयी अधिक जागृत असतात. ती प्रत्यक्षेत्रात ठळकपणे भाग घेते आणि तिची आवड दाखवते. अखेर अनेक वर्षाच्या संघर्षानंतर त्यांना योग्य मार्गावर चालण्याचा हक्क मिळत आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे -**

१) महिला विकासासाठी असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करणे.

२) महिला सक्षमीकरण संदर्भात सरकारच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

**महिला सक्षमीकरण म्हणजे काय?**

महिला सक्षमीकरणाची व्याख्या अगदी सोप्या शब्दात करता येते की ती महिलांना सामर्थ्यवान बनवते. ज्यामुळे त्या त्यांच्या जीवनाशी संबंधित प्रत्येक निर्णय स्वतः घेऊ शकता आणि कुटुंब, समाजात चांगले जगू शकतात

"महिला सक्षमीकरण म्हणजे त्यांना समाजात त्यांचे खरे अधिकार मिळवून देणे."

**भारतात महिला सक्षमीकरणाची गरज -**

भारतामध्ये प्राचीन काळापासून लैंगिक असमानता होती म्हणून महिला सक्षमीकरणाची गरज निर्माण झाली. महिलांना त्यांच्यास कुटुंबाकडून आणि समाजाकडून अनेक कारणाने दडपण्यातआले आणि कुटुंबात, समाजात त्यांच्यावर अनेक प्रकारच्या हिंसाचार आणि भेदभावाला समोर जावे लागले. हे केवळ भारतातच नाही तर इतर देशांमध्ये हे दिसून येतात.

प्राचीन भारतीय समाजात सती प्रथा, हुंडा प्रथा, लैंगिक हिंसा, कौटुंबिक हिंसा, गर्भात मुलीची हत्या, कामाच्या ठिकाणी लैंगिक शोषण, बालमजुरी, बालविवाह आणि देवदासी प्रथा इत्यादी भेदभाव करणाऱ्या प्रथा होत्या. अशा अपप्रवृत्तीचे कारण पितृ सत्ताक समाज आणि पुरुष श्रेष्ठता मानसशास्त्र आहे. कुटुंबातील स्त्रियांचे सामाजिक, राजकीय अधिकार (काम करण्याचे स्वातंत्र्य, शिक्षणाचा अधिकार इत्यादी) पूर्णपणे प्रतिबंधित करण्यात आले होते. महिला विरुद्ध च्या काही वाईट प्रथा खुल्या मनाच्या लोकांनी आणि महान भारतीय लोकांनी काढून टाकल्या ज्यांनी महिला विरुद्ध भेदभाव करणाऱ्या कृतीसाठी आवाज उठवला. राजा राम मोहन राय यांच्या सततच्या प्रयत्नामुळे इंग्रजांना सती प्रथा बंद करण्यास भाग पाडल्या गेले. नंतर इतर भारतीय समाजसुधारकांनी आवाज उठवला आणि महिलांच्या उत्थानासाठी कठोर संघर्ष केला. गेल्या काही वर्षात लैंगिक असमानता आणि महिला वरील वाईट प्रथा दूर करण्यासाठी सरकारने अनेक घटनात्मक आणि कायदेशीर

अधिकार तयार केले आहेत मात्र एवढा मोठा प्रश्न सोडवण्यासाठी महिला सह सर्वांच्या सततच्या सहकार्याची गरज आहे.

**मानवी अधिकाराचा पूर्व इतिहास -**

आधुनिक मानवी हक्क चळवळीस दुसऱ्या महायुद्धानंतर जोर मिळाला तरी ही संकल्पना सर्वप्रमुख धर्म, संस्कृती आणि तत्वज्ञानात आढळते. इतिहासात मानवी हक्काविषयीचा सर्वात जुना संदर्भ इ.स. पूर्व २३५० सालातील लगाश मधील उरुकागिना येथील सुधारणेबाबत येतो. त्यानंतर त्यांचा उल्लेख नव सुमेरियन संस्कृतीतील ऊर नममुच्य संहितेमध्ये आढळतो. प्राचीन इराणी साम्राज्याने इ.स. पूर्व ५३९ साली घोषित केली सायरस वृत्तचिती हा मानवी हक्क विषयीचा पहिला लिखित दस्तावेज मानण्यात येतो. या वृत्तचिती द्वारे गुलामीची प्रथा संपुष्टात आणण्यात आली. भारतातील मौर्य साम्राज्याने घालून दिलेली तत्वे तत्कालीन काळात अभूतपूर्व होती. कलिंग युद्धामुळे सम्राट अशोकाच्या धोरणामध्ये मानवी हक्कांना प्राधान्य मिळाले. इस्लाम धर्माच्या उदया नंतर अरब स्थानात मानवी हक्कांना स्थान प्राप्त झाले. मॅग्ना कार्टा नावाची सनद इ. स. १२१५ मध्ये इंग्लंडमध्ये जाहीर करण्यात आली. आजच्या संसदीय व्यवस्थेची मुळे या सनदेत आहेत. १० डिसेंबर १९४८ रोजी संयुक्त राष्ट्र महासभेने घोषणापत्र स्वीकारले. परंतु भारताने २८ सप्टेंबर १९९३ रोजी मानवाधिकार कायदा लागू करण्यात सुरुवात केली आणि 12 ऑक्टोबर 1993 रोजी राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची स्थापना करण्यात आली.

**महिला सक्षमीकरणाचे फायदे -**

पूर्वी स्त्रियांना पुरुषाबरोबर समाजात स्थान मिळत नव्हते. तिच्यावर होत असलेल्या अन्यायविरुद्ध तोंड देऊ शकत नसत. परंतु महिला सक्षमीकरणामुळे तिला स्वातंत्र्य मिळवून दिले आहे.

१) स्त्रिया प्रत्येक कामात पुरुषाबरोबर सक्रिय सहभाग घेऊ लागले आहे.

२) स्त्रिया त्यांच्या जीवनाशी संबंधित निर्णय स्वतः घेत आहे.

३) स्त्रिया स्वतःच्या हक्कासाठी लढू लागले आहेत आणि हळूहळू स्वावलंबी होत आहेत.

४) पुरुषही आता महिलांना समजून घेत आहेत त्यांना त्यांच्या हक्क देत आहे.

५) महिला सक्षमीकरणामुळेच महिला उच्चपदस्थ विराजमान होत आहे.

**महिला सक्षमीकरणासाठी सरकारच्या योजना -**

महिला सक्षमीकरणासाठी भारत सरकारच्या अनेक योजना आहे. यातील अनेक योजना रोजगार, शेती आणि आरोग्य यासारख्या गोष्टीशी संबंधित आहेत. भारतीय महिलांची परिस्थिती लक्षात घेऊन या योजना तयार करण्यात आले आहे जेणेकरून त्यांच्या समाजातील सहभाग वाढेल. यापैकी काही मुख्य योजना म्हणजे मनरेगा, सर्व शिक्षा अभियान, जननी सुरक्षा योजना इत्यादी.

**अ) बेटी बचाव बेटी पढाओ योजना -**

स्त्री भ्रूण हत्या आणि मुलीचे शिक्षण लक्षात घेऊन ही योजना करण्यात आली आहे या अंतर्गत मुलींच्या भल्यासाठी नियोजन करून त्यांना आर्थिक मदत देऊन मुलीं ओझे समजणे अशी विचारसरणी बदलण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**ब) महिला हेल्पलाइन योजना -**

या योजनेअंतर्गत महिलांना 24 तास आपत्कालीन सहाय्य सेवा पुरवली जाते. महिला या योजनेअंतर्गत विहित क्रमांकावर कोणत्याही प्रकारच्या हिंसाचाराची किंवा गुन्ह्याची तक्रार करू शकतात या योजनेअंतर्गत देशभरातील 181 क्रमांकावर डायल करून महिला आपल्या तक्रारी नोंदवू शकतात.

**क) उज्वला योजना -**

महिलांची तस्करी आणि लैंगिक शोषणापासून संरक्षण करण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे, यासोबतच त्यांच्या पुनर्वसन आणि कल्याण साठी त्या अंतर्गत काम केले जाते.

**ड) महिलासाठी प्रशिक्षण आणि रोजगार कार्यक्रमास समर्थन -**

या योजनेअंतर्गत महिलांचे कौशल्य वाढवण्याचे काम केले जाते, जेणेकरून त्यांनाही रोजगार मिळू शकेल किंवा त्या स्वतःचा रोजगार सुरू करू शकतील. या कार्यक्रमांतर्गत महिलांनी शेती, फल उत्पादन, हातमाग, टेलरिंग आणि मत्स्य व्यवसाय अशा विविध क्षेत्रात शिक्षण दिले जाते.

**इ) महिला शक्ती केंद्र -**

ही योजना ग्रामीण महिलांना सामुदायिक सहभागातून सक्षम करण्यावर भर देते. या अंतर्गत विद्यार्थी आणि व्यावसायिका सारखे समुदाय स्वयंसेवक ग्रामीण महिलांना त्यांचे हक्क आणि कल्याणकारी योजनांची माहिती देतात.

**फ) पंचायती राज योजना मध्ये महिलांसाठी आरक्षण -**

2009 मध्ये भारताच्या केंद्रीय मंत्रिमंडळाने पंचायती राज संस्थांमध्ये ५० टक्के महिला आरक्षणाची घोषणा केली हा सरकारचा ग्रामीण भागातील महिलांची सामाजिक स्थिती सुधारण्याचा प्रयत्न आहे.

**महिला सक्षमीकरणासाठी संसदेने पारित केलेले काही कायदे -**

महिलांना कायदेशीर अधिकारांसह सक्षम करण्यासाठी संसदेने काही कायदे ही पारित केले आहे ते पुढील प्रमाणे आहे.

१) हुंडा बंदी कायदा १९६१

२) अनैतिक वाहतूक कायदा १९५६

३) समान मोबदला कायदा १९७६

४) लिंग चाचणी तंत्र कायदा १९९४

५) बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६

६) कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ कायदा २०१३

**निष्कर्ष -**

बदलत्या काळानुसार आधुनिक युगातील स्त्रिया लिहिण्या वाचायला मोकळ्या झाल्या आहेत. त्यांना त्यांच्या अधिकारांची जाणीव आहे आणि ती स्वतःचे निर्णय घेते आता त्या घरातील उंबरठा ओलांडून देशासाठी विशेष महत्त्वाचे काम करते. आपल्या देशातील लोकसंख्येपैकी जवळपास निम्मे महिला आहेत या कारणास्तव राष्ट्राच्या विकासाच्या महानकार्यात महिलांची भूमिका आणि योगदान पूर्णपणे योग्य दृष्टिकोनातून ठेवूनच राष्ट्र उभारण्याचे ध्येय साध्य करता येते. भारतातही अशा स्त्रियांची कमी नाही ज्यांनी समाजातील बदलाची आणि स्त्री

सन्मानाची आंतरिक भीती आपल्यावर हावी होऊ दिली नाही. असेच एक उदाहरण म्हणजे सहारणपुरच्या अतिया साबरी. तिहेरी तलाक विरोधात आवाज उठवणारी अतिया ही पहिली मुस्लिम महिला आहे. ॲसिड पीडितांच्या विरोधात न्यायासाठी लढणाऱ्या वर्षा जवळेकर यांनाही थांबवण्याचा अयशस्वी प्रयत्न केला गेला, मात्र त्यांनी न्यायासाठी लढा सोडला नाही. आपल्या देशात अशी अनेक उदाहरणे आहेत जी महिला सक्षमीकरणाचा समानार्थी बनत आहे.

आज देशात सर्वच अंगाने स्त्री शक्तीचे सक्षमीकरण करण्याचे प्रयत्न सुरू आहे. याचा परिणामही दिसून येत आहे. आज देशातील महिला जागृत झाल्या आहेत. आजची स्त्री घर आणि संसाराची जबाबदारी अधिक चांगल्या पद्धतीने पेलू शकता हा विचार अधिक मजबूत झाला आहे. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या आजच्या स्त्रिया सर्वात मोठ्या कार्यक्षेत्रात आपले महत्त्वाचे योगदान देत आहे. मजुरीचे काम असो की अंतराळ वर जाणे महिला प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करत आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची -**

१) पंडित नेहरू १९७५, भारताचा शोध पाचवी आवित्ती निकिता प्रकाशन दिल्ली.

२) घोटाळे रा.ना. समाजशास्त्रीय संशोधन तत्व व पद्धती मंगेश प्रकाशन नागपूर.

३) महाराष्ट्र शासन, महिला संबंधी धोरण.

४) कुलकर्णी बी. डी. ढमढरे एस. व्ही. २००७, "अर्थशास्त्रीय संशोधन पद्धती" , डायमंड पब्लिकेशन नागपुर.

५) बोधनकर सुधीर, अलोणी विवेक, कुलकर्णी मृणाल २०१४, "सामाजिक संशोधन पद्धती", श्री साईनाथ प्रकाशन नागपूर.

६) भारतीय स्त्री आणि मानवधिकर, डॉ. स्मिता मेहत्रे.

७) मानवाधिकार और महिला, राजबाला सिंह.

८) महिला और मानवाधिकार, रमा शर्मा, एम. के. शर्मा.